# जाहिर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पुणे महानगर प्रदेशाच्या हद्दीतील मंजूर प्रादेशिक योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधित क्षेत्र पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सदर मिळकतीच्या हितसंबंधितांकडून विकास हक्काच्या (डी.आर. सी) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधितांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिला आहे.

उपरोक्त नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधिताने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत महानगर नियोजनकार विकास परवानगी विभाग, स.नं १५२-१५३, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध पुणे - ४११०६७ पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मूळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरुपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला डी.आर.सी च्या स्वरुपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन - जिल्हा पुणे, तालुका हवेली, येथील तसेच पुणे महानगर प्रदेश हद्दीतील मौजे वडकी येथील ग.नं. १५५५ मधील (जमिन धारकाचे नाव) श्री. संतोष गेनबा साबळे, श्री.ज्ञानेश्वर बाबुराव साबळे, श्री. बाळासाहेब बाबुराव साबळे, श्रीमती इंदूबाई बाबुराव साबळे, श्री. अतुल गेनबा साबळे, श्रीमती श्वेता गेनबा साबळे, श्रीमती शकुंतला गेनबा साबळे व सौ. कविता संजय कामठे यांचे एकूण क्षेत्र १३५००.०० चौ.मी. या मिळकतीमधील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मंजूर प्रादेशिक योजनेतील ११०.०० मी. रिंग रोड बाधित क्षेत्र २०००.०० चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे :

**चतु:सिमा :-**

ग.नं. १५५५ पै २००० चौ.मी.

| | |
|---|---|
| पूर्व | - लागू ग.न. १५५४, व ग.न. १५५२ |
| पश्चिम | -लागू ग.न. १५५५ पै |
| उत्तर | -लागू ग.न. १५५२ |
| दक्षिण | -लागू ग.न. १५५५ पै |

(विजयकुमार गोस्वामी)
**महानगर नियोजनकार**
**विकास परवानगी विभाग**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**पुणे.**

सदरची जाहीर नोटीस पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे www.pmrda.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.